साप्रवि/रवका/न.क्र.५/
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं.मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत
तळ मजला,धारावी रोड,माटुंगा
मुंबई - ४०००१९.

# प्रशासकीय परिपत्रक क्र.४२ दिनांक ५/५/२००६

विषय : मा.राष्ट्रपतींचे नाव व छायाचित्र यांच्या गैरवापरास प्रतिबंध.

संदर्भ : १) कक्ष अधिकारी,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्र.संकीर्ण-२००६/आर-५०९/ऊर्जा-२ दि.१७.४.२००६.
२) सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-१००६/४७६/३० दिनांक ४.४.२००६.

......

भारताचे माननीय राष्ट्रपतींचे नाव व छायाचित्र यांच्या गैरवापरास प्रतिबंध व्हावा म्हणून केंद्र शासनाचा राष्ट्रीय चिन्हे व नावे (गैरवापरास प्रतिबंध) १९५० हा कायदा अस्तित्वात आला आहे. सदर कायद्याची अंमलबजावणी योग्यप्रकारे होत नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे, भारताचे माननीय राष्ट्रपतींचे नाव व छायाचित्र यांचा उपयोग वाणिज्यिक कारणाकरिता करण्यास अनुमती नाही अशा आशयाचे निर्देश शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-१००६/४७६/३० दिनांक ४.४.२००६ अन्वये निर्गमित केले आहेत.

महाराष्ट्र वीज वितरण कंपनीच्या सर्व क्षेत्रीय कार्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, माननीय राष्ट्रपतींचे नाव व छायाचित्र यांचा उपयोग वाणिज्यिक कारणाकरीता करण्यास अनुमती नाही असे सर्वांच्या निदर्शनास आणावे व याबाबत आवश्यक दक्षता घ्यावी.सदर परिपत्रकाची प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाती सोबत जोडण्यात आली आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

(सु.य.पाटील)
मुख्य महाव्यवस्थापक (क)

प्रत :
म.रा.वी.वितरण कंपनीच्या विभागीय कार्यालयस्तरा पर्यतच्या प्रेषण यादीप्रमाणे.

K/Adm.Cir.F.N.9
4/2/06